महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग
**सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,छत्रपती संभाजीनगर**
भडकल गेट जवळ, छत्रपती संभाजीनगर - 431 001, फोन - 0240-2364481
Website : www.dvet.gov.in, E-mail - jtdir.aurangabd@dvet.gov.in / aurangabadro@gmail.com

**परिपत्रक**

जा.क्र.मविका/आस्था-३(४)/भरती/२०२५/ 6305
छत्रपती संभाजीनगर,दिनांक:-
21 AUG 2025

संदर्भ:-१) महाराष्ट्र लोक सेवा आयोग जाहिरात क्र. १११/२०२३.
२) संचालनालयाचे पत्र क्र.व्यशिप्र-२०२५/आस्था-३/प्र.क्र.३३/मलोआ/का-४, दिनांक-३१/०७/२०२५.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.५९८३ दिनांक-०७/०८/२०२५.

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्या खालील,प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर विभागाच्या विविध संस्थांतील लिपीक नि टंकलेखक पदाचे ४९ पदे भरण्या करिता राज्य लोकसेवा आयोगा मार्फत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त गुणवत्ता यादीतील पात्र उमेदवारांचे कागदपत्र पडताळणी करणे करिता **दिनांक-१३/०८/२०२५** बुधवार रोजी उपस्थित रहाणे बाबत सुचित करण्यात आलेले होते. या नुसार एकुण ४९ पैकी ४४ उमेदवारांनी उपस्थित राहून कागदपत्र पडताळणीची कार्यवाही पुर्ण केलेली आहे. दिनांक-१३/०८/२०२५ रोजी च्या **पडताळणीस अनुपस्थित असलेल्या ५ उमेदवारांना एक वेळची संधी म्हणुन दिनांक-२९/०८/२०२५ शुक्रवार रोजी सोबतच्या प्रपत्र - अ मधे नमुद कागदपत्राच्या मुळ प्रती सह स्वयं साक्षांकित छायांकित (दोन) (२) प्रती** सोबत अलीकडील कालावधीचे दोन पासपोर्ट छायाचित्र सह **सकाळी ११.०० वा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,भडकल गेट जवळ छत्रपती संभाजीनगर** येथे दिलेल्या वेळेत उपस्थीत रहावे.

सदर दिवशी उपस्थित न राहिल्यास उमेदवराचे नाव भरती प्रक्रियेतून वगळण्यात येईल या संदर्भात ऑनलाईन / ऑफलाईन / ई-मेल / वॉट्स अप / सोशल मिडीया /मान्यवरांची,लोकप्रतिनिधिंची शिफारस / तक्रार / विनंती विचारात घेतली जानार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

प्रमाणपत्र / कागदपत्र पडताळणीस उमेदवाराने व्यक्तीश: स्व खर्चाने उपस्थित रहावयाचे आहे. उमेदवारा खेरीज कोणीही प्रतीनिधी / नातेवाईक यांना पडताळणीस उपस्थीत रहाता येणार नाही. मुळ प्रमाणपत्र / कागदपत्र पडताळणी च्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे. कागदपत्र पडताळणीस बोलविण्यात आले म्हणजे उमेदवार निवडला गेला असा अर्थ होत नाही. संबंधित उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणी नंतरच पात्रता निश्चित केली जाईल. उमेदवारांचे जात / दिव्यांग / अनाथ / नॉन क्रमिलेअर / इत्यादि आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांचे या कार्यालयाद्वारे सक्षम प्राधिकारी / आस्थापना द्वारे तपासणी करण्यात येईल सदरील अहवाल प्राप्त झाल्यानंतरच आदेश निर्गमित करण्यात येतील. उमेदवाराने सादर केलेले प्रमाणत्र/कागदपत्र खोटे/बनावट असल्याचे आढळून आल्यास उमेदवारास या विभागाच्या भरतीस कायमस्वरूपी अपात्र ठरवले जाईल व नियमा प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

प्रमाणपत्र / कागदपत्र पडताळणी अंती पात्र ठरणा-या उमेदवारांना विभागातील रिक्त असलेल्या सामाजिक व समांतर आरक्षणनिहाय पदे दिव्यांग व अनाथ आरक्षण उमेदवार इत्यादी बाबी विचारात घेउन पदस्थापना करण्यात येईल.पदस्थापने बाबत कोणती ही शिफारस / विनंती अर्ज / स्वीकारला जाणार नाही या कार्यालयाच्या प्राधान्याने पदस्थापने बाबत कार्यवाही करण्यांत येईल. तसेच सोबत जोडलेल्या महाराष्ट्र लोक सेवा आयोग प्रपत्रातील अती व शर्ती सर्व उमेदवारांना लागू राहातील.

(पी.टी.देवतळे)
सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,छत्रपती संभाजीनगर.

सोबत :-प्रपत्र -अ / प्रमाणपत्र नमुना १ व २.
प्रती:- महाराष्ट्र लोक सेवा आयोग जाहिरात क्र. १११/२०२३ अन्वये या विभागाच्या भरतीस पात्र उमेदवार १ ते ४९.

**प्रपत्र - अ**

| अ.क्र | आवश्यक दस्तऐवज / कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|
| १ | अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्या याबाबतचे सक्षम प्राधिका-याने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र<br>(सर्व उमेदवारां करिता आवश्यक) |
| २ | वयाचा पुरावा | जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / सक्षम प्राधिका-याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र<br>(सर्व उमेदवारां करिता आवश्यक) |
| ३ | जात प्रमाणपत्र | (पात्र उमेदवारां करिता आवश्यक) |
| ४ | जात वैधता प्रमाणपत्र | उपलब्ध नसल्यास खालील प्रमाणपत्र-१ जोडावे<br>(पात्र उमेदवारां करिता आवश्यक) |
| ५ | शैक्षणिक अर्हता | १. ई.१० वी<br>२. ई. १२ वी<br>३. पदविका<br>४. पदवी<br>५. पदव्युत्तर<br>६. ईतर<br>(सर्व उमेदवारां करिता आवश्यक) |
| ६ | टंकलेखन प्रमाणपत्र | १.मराठी-३०<br>२.इंग्रजी-४०<br>(सर्व उमेदवारां करिता आवश्यक) |
| ७ | संगणक अर्हता प्रमाणपत्र | MS-CIT (सर्व उमेदवारां करिता आवश्यक) |
| ८ | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र | सोबत जोडलेले प्रमाणपत्र -२ जोडावे<br>(सर्व उमेदवारां करिता आवश्यक) |
| ९ | महिला / दिव्यांग / अनाथ / खेळाडू / भुकंपग्रस्त प्रकल्पग्रस्त / अंशकालीन उमेदवार / माजी सैंनिक उमेदवार प्रमाणपत्र | आवश्यक प्रमाणपत्र जोडावे<br>(पात्र उमेदवारां करिता आवश्यक) |
| १० | नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र | (पात्र उमेदवारां करिता आवश्यक) |
| ११ | पुर्वी शासन सेवेत असल्यास संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र | (पात्र उमेदवारां करिता आवश्यक) |
| १२ | नावात बदल प्रमाणपत्र / कागदपत्र | (पात्र उमेदवारां करिता आवश्यक) |
| १३ | ओळखपत्र | आधार कार्ड |
| १४ | Grade /Credit System Conversion Document | लागू असल्यास जोडावे |
| १५ | इतर आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्र | लागू असल्यास जोडावे |
| १६ | महाराष्ट्र रज्य लोकसेवा आयोग परिक्षेचे प्रवेश पत्र (HALL TICKIT) | (सर्व उमेदवारां करिता आवश्यक) |
| १७ | महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग निवड पत्र | (सर्व उमेदवारां करिता आवश्यक) |

* सर्व कादगपत्रे उपरोक्त प्रमाणे अनुक्रमे जोडावे.

## प्रमाणपत्र - १
## जात वैधते बाबत हमिपत्र

मी श्री / श्रीमती- ---------------------------------------------------------- महाराष्ट्र राज्यसेवा आयोगाद्वारे प्रसिद्ध जाहिरात क्र.०१/२०२३ अनुसार सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर अंतर्गत लिपीक नि टंकलेखक पदाच्या गुणवत्ता यादीतील अनुक्रमांक - --------------- रोल नंबर- ------------------- मुळ प्रवर्ग - --------------------------- निवड प्रवर्ग - ------------------------------ नुसार निवड झालेली आहे आज रोजी माझे कडे जातीचे प्रमाणपत्र क्र - ---------------------------------------------------------- दिनांक- ------------------ तपशिलाचे उपलब्ध आहे. सदर बाबतीत हमिपत्र देत आहे की मला नियुक्ती आदेश मिळाल्यास पूढील सहा महिण्यात जात वैधता मिळवणे बाबत मी पदस्थापना देण्यात आलेंल्या संस्थाप्रमुखां मार्फत स्वत: प्रथम प्राधान्याने कार्यवाही करेल ही या हमिपत्रा द्वारे हमी देत आहे.तसेच माझे जात वैधता दावा समितीने फेटाळला अथवा रद्द केल्यास उद्भवणा-या परिणामाची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासु

---

## प्रमाणपत्र - २
## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार
## अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा
## नमुना - अ
## (नियम ४ पहा)

मी श्री / श्रीमती ________________________________________________ श्री________________________________यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी / पती, वय______वर्षे, राहणार______________________________याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की.

१. मी ______________________________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला ________ इतकी हयात मुले आहेत.त्यापैकी दिनांक **२८ मार्च २००५** नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या __________ आहे. (असल्यास, जन्मतारखा नमूद कराव्यात.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या **दोनपेक्षा अधिक** असेल तर दिनांक **२८ मार्च २००६** नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी **अपात्र ठरण्याची जाणीव** मला आहे.

**स्थळ:** ____________________
**दिनांक:** ____________________

**(उमेदवार स्वाक्षरी)**